**<u>वादीतर्फे सा.क्र.१ आनंदीबाई आत्माराम घरत यांचा शपथेवर सरतपास पुढे सुरु वकील श्री. भगत यांचेमार्फत</u>**

(१३) निशाणी ३ वरील अनुक्रमांक १ वर सर्व्हे नं.३४ यामधील वेगवेगळया हिश्श्यांचे सहा सातबारा उता-यांच्या सत्यप्रती दाखल केलेल्या आहेत. त्यांना एकत्रितपणे **<u>निशाणी २१८</u>** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक २ वर मिळकत क्र.७ ते ९ यांचे सातबारा उता-यांच्या सहीशिक्क्यांच्या नकला दाखल केलेल्या आहेत. त्यांना एकत्रितपणे **<u>निशाणी २१९</u>** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक ३ वर मिळकत क्र.१ ते ६ यांचे संपादीत मिळकतीच्या ॲवार्डची सहीशिक्क्याची नक्कल दाखल केली आहे. त्यास **<u>निशाणी २२०</u>** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक ४ वर मिळकत क्र.७ यांचे संपादीत मिळकतीच्या ॲवार्डची सहीशिक्क्याची नक्कल दाखल केली आहे. त्यास **<u>निशाणी २२१</u>** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक ५ वर मिळकत क्र.८ यांचे संपादीत मिळकतीच्या ॲवार्डची सहीशिक्क्याची नक्कल दाखल केली आहे. त्यास **<u>निशाणी २२२</u>** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक ७ वर मिळकत क्र.१० व ११ यांचे संपादीत मिळकतीच्या ॲवार्डची सहीशिक्क्याची नक्कल दाखल केली आहे. त्यास **<u>निशाणी २२३</u>** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक ८ वर मिळकत क्र.१२ वर यांचे संपादीत मिळकतीच्या ॲवार्डची सहीशिक्क्याची नक्कल दाखल केली आहे. त्यास **<u>निशाणी २२४</u>** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक ९ वर दावा मिळकतीचे फेरफार नोंद क्र.३८५१ व ४५८४ चे सहीशिक्क्यांचे उतारे दाखल केले आहेत. त्यांना एकत्रितपणे **<u>निशाणी २२५</u>** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक १२ वर संपादीत मिळकतीच्याबाबत माहितीच्या अधिकारान्वये सिडकोकडून मिळवलेल्या माहितीची मुळ प्रत दाखल केली

आहे. त्यास **निशाणी २२६** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक १३ वर विशेष दिवाणी दावा क्र.११४/२००८ ची सहीशिक्क्याची नक्कल दाखल केली आहे. त्यास **निशाणी २२७** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक १४ वर आम्ही वकिल भरत नवाळे यांच्यामार्फत प्रतिवादी क्र. १ ते ३, ८, ९ व ११ यांना पाठविलेल्या रजिस्टर दिनांक १४/०५/२०११ रोजीची नोटीसची स्थळप्रत दाखल केली आहे. तीच तीच असून त्यावर माझे वकिलांची सही आहे. त्यास **निशाणी २२८** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक १६ वर प्रतिवादी क्र. १ ते ३, ८,९, ११ यांना पाठविलेल्या नोटीसीची पोहचपावत्या दाखल केल्या आहेत. त्यांना एकत्रितपणे **निशाणी २२९** देण्यात येते. निशाणी ३ वरील अनुक्रमांक १७ वर प्रतिवादी क्र.२७ ते २९ यांना वादीतर्फे पाठविलेल्या रजिस्टर नोटीसची स्थळप्रत दाखल केली आहे. ती तीच असून त्यावर वकिलांची सही आहे. त्यास **निशाणी २३०** देण्यात येते. निशाणी १७ वरील यादीमध्ये अनुक्रमांक १ वर दैनिक वादळवारा या वर्तमानपत्रात प्रतिवादी यांनी दावा मिळकतीसंदर्भात दिलेली जाहीर नोटीस मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी २३१** देण्यात येते. नशाणी १७ वरील यादीमध्ये अनुक्रमांक २ वर वादीच्या वकिलांनी सदर नोटीसीस घेतलेली हरकतीची स्थळप्रत दाखल केली आहे. ती तीच असून वकिलांची सही आहे. त्यास **निशाणी २३२** देण्यात येते.

उर्वरीत सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

समक्ष वाचुन दाखविले व बरोबर
आहे असे म्हणते.

सही/-
पनवेल (अ. अ. गोडसे)
दिनांक :०४/०१/२०२४ २रे सहदिवाणी न्यायाधिश व. स्तर पनवेल